बीड संकेत

E-mail- bhrbsanket@gmail.com संपादक-नरेन्द्र कांकरिया

वर्ष १६ अंक २१७ वा | शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २००९ | बीड | पाने-४ मुल्य रू.१

P.R.No. L-2/18/RNP/202/Beed/2009-11 R.N.I. No.70487/94 फोन/फॅक्स क्र. (०२४४२)२३०११०

# मुंबईत औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन

मुंबई दि. १९ (बातमीदार) : हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया या कंपनीने यंदा मुंबईत 'मेगा इंडस्ट्रियल ट्रेड फेअर' अर्थात औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे अयोजन केले आहे. दि. १० ते १३ डिसेंबर दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, पश्चिम द्रुतगती महामर्गा, गोरेगाव (पू.) येथे आयोजित या महामेळाव्यात सीमॅट इंडिया (मटेरियल्स हँडलिंग अँड लॉजिस्टिक्स), मोशन-ड्राईव्ह अँड ऑटोमेशन, इंडिस्ट्रीयल ऑटोमेशन इंडिया (प्रोसेस अँड प्रोडक्शन ऑटोमेशन अँड इंडस्ट्रियल बिल्डिंग ऑटोमेशन), एनर्जी इंडिया (सोल्यूशन्स फॉर एनर्जी एफिशिएन्सी, रिन्युएबल एनर्जी अँड कॅप्टीव्ह पॉवर प्लान्टस्) ही चार प्रमुख प्रदर्शने भरवली जातील. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महामेळाव्याचं प्रमुख आकर्षण आहे.

फ्लुईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे या महामेळाव्यात ऑटोमेशन किऑस्क उभारण्यात येणार आहे. फ्लूईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्य औद्योगिक संस्थांनी या महामेळाव्यात ऑटोमेशन तंत्रज्ञान आणि ॲप्लिकेशन ट्रेनिंग संदर्भात माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महामेळाव्यात सहभागी होणाऱ्यांना तज्ज्ञांशी थेट संपर्क साधता येणार आहे. ऑटोमेशन किऑस्क ही एक अनोखी संकल्ना असून यापूर्वी जगता कुठेही या संकल्पनेचा वापर करण्यात आलेला नाही.

याशिवाय लेन्झ कंपनीने तयार केलेला ८४०० फ्रिक्वेन्सीचा नवीन इन्वहर्टर, ओमाल कंपनीचे ॲक्चूएटर्स आणि व्हाल्वस्, पीटर्स इंडू प्रोडक्ट कंपनीचे न्यूमॅटिक, हायड्रॉलिक, सेन्सर अँड ऑटोमेशन प्रोडक्ट, केबल ॲडाप्टर, सेन्सर कनेक्टर, एम८/एम१२, कनेक्टर मोल्डेड, सेन्सर कनेक्टर एम८/एम१२ फिल्ड ॲटॅचेबल, इलेक्ट्रॉनिक प्रेशर स्विच इ. स्टॅबिलस, सेन्टॉर्क, ॲटॉस स्पा कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रोहायड्रॉलिक्स आदींचा या महामेळाव्यात समावेश असेल. पुरवठादार आणि ग्राहक कंपन्या या दोहोंनाही उद्योग जगतातल्या नवनवीन ट्रेंडस्च्या माहितीची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.